# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 02.07.2024** **वार – मंगळवार**

---

**आषाढी पालख्या**

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या संत श्री ज्ञानेश्वर महाराज आणि संत श्री तुकाराम महाराज यांच्या पालख्या आपल्या पुढील मुक्कामासाठी आज सकाळी पुढे मार्गस्थ झाल्या. संत तुकाराम महाराजांची पालखी हडपसरमार्गे लोणी काळभोर इथे मुक्कामासाठी साठी जात आहे, तर, संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आज दिवे घाटाचा अवघड मानला जाणारा टप्पा पार करून सासवडच्या मुक्कामी जाईल.

**प्राधनमंत्री पीक विमा योजना**

राज्यातील शेतकऱ्यांना प्राधनमंत्री पीक विमा योनजेसाठी केवळ एक रूपयात विमा काढण्यात येतो मात्र सामान्य सेवा केंद्राकडून शेतकऱ्यांची आर्थक लूट होत असल्याचे दिसून येत आहे. सामान्य सेवा केंद्रांना म्हणजे सीएससी केंद्राना प्रति शेतकरी 40 रूपये शुक्ल निर्धारित केले आहे, मात्र या केंद्राकडून दोनश ते आडीचशे रूपये प्रति शेतकरी शुल्क आकारण्यात येत असल्याच्या शेतकऱ्यांकडून तक्रारी येत आहेत. अशा केद्रांवर कडक कारवाई करण्याचा इशारा कृषी विभागानं दिला आहे

**नाईक पुरस्कार**

माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतिदिनी आणि कृषिदिनाच्या औचित्याने देण्यात येणारा यंदाचा वसंतराव नाईक पुरस्कार, पुण्यातील राईज एन शाईन बायोटेक प्रा. लि. च्या व्यवस्थापकीय संचालिका डॉ. भाग्यश्री प्रसाद पाटील यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. आधुनिक फुलशेतीतील उल्लेखनीय योगदानासाठी त्यांना या पुरस्काराने गौरवण्यात आलं. वसंतराव नाईक कृषि संशोधन आणि ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्यावतीने हा पुरस्कार देण्यात येतो.

**स्टार्टअप सप्ताह**

राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीतर्फे नाविन्यपूर्ण स्टार्टअप्सला चालना देण्यासाठी 'महाराष्ट्र स्टार्टअप सप्ताह' आयोजित करण्यात येणार आहे. इच्छुक स्टार्टअप्सनी 1 ऑगस्ट 2024 पर्यंत अर्ज करावेत, असं आवाहन कौशल्य, रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले आहे. कौशल्य विकास दिंडीच्या निमित्ताने पुण्यात आले असताना लोढा यांनी ही माहिती दिली.

**<u>गंगाधर स्वरोत्</u>**

'स्वरनिनाद' या संस्थेच्या वतीनं दरवर्षी आयोजित करण्यात येत असलेल्या गंगाधर स्वरोत्सवाच्या दहाव्या वर्षांचं औचित्य साधत, 'युवरंग' या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. युवा कलाकारांच्या सादरीकरणाद्वारे गायन, वादन आणि नृत्य असा त्रिवेणी संगम 'युव रंग' का विशेष कार्यक्रमामध्ये रसिकांनी अनुभविला. यावेळी रागिणी देवळे, सुरंजन जायभाये, मैत्रेयी भोसले, अनिरुद्ध ऐथल, सोहम गोराणे, षड्ज घोडखिंडी तसंच राधिका करंदीकर यांनी कलाविष्कार सादर केले.

**<u>मालमत्ता</u>**

पुणे छावणी परिषदेतील नागरी सुविधा पुरवणाऱ्या त्याचबरोबर भाडेतत्त्वावरील स्थावर मालमत्ता पुणे महापालिका प्रशासनाकडं हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सध्या सुरु असली तरी छावणी परिषदेच्या हद्दीतील भारत सरकारच्या नावावर अथवा मालकीच्या असलेल्या स्थावर आणि जंगम मालमत्ता  मात्र छावणी परिषदेकडे कायम ठेवण्याचे स्पष्ट निर्देश संरक्षण मालमत्ता विषयक महासंचालक कार्यालयाकडून देण्यात आले आहेत. लष्कराच्या दक्षिण मुख्यालयातील मालमत्ता विभागाचे उपसंचालक हेमंत यादव यांनी याबद्दलचे आदेश विभागातील सर्व छावणी परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पाठवले आहेत.

**<u>पुणे झिका</u>**

पुणे शहरात झिका विषाणूचा प्रादुर्भाव वाढत असून आत्तापर्यंत 6 रुग्णांना संसर्ग झाल्याचं आढळून आलं आहे. पुण्यातील एरंडवणे भागातील 28 वर्षीय गर्भवती महिलेला झिका विषाणूची लागण झाल्याचं तपासणी अहवालात दिसून आलं असून, आणखी एका गर्भवती महिलेला झिका विषाणूची लागण झाल्याचे आढळून आलं आहे. या दोन्ही महिलांची प्रकृती स्थिर आहे. रोगनिदान झालेल्या रुग्णांनी देशात किंवा परदेशात प्रवास केलेला नसल्याची माहिती पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे देण्यात आली. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयामार्फत पाणी साठणाऱ्या 25 आस्थापनांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**